वागळे वाहतूक उपविभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसुचना

महाराष्ट्र पोलीस
ठाणे शहर

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in



जा.क्र. पोउपआ/वावि/वाहतूक अधिसूचना/ १३८ /२०२६ दि. २५ /०७/२०२६

—: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :—

ज्याअर्थी, ठाणे महानगरपालिका क्षेत्रामध्ये **वागळे** वाहतूक उपविभागाचे हद्दीत मा. श्री. एकनाथ शिंदे, उप मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांचे हस्ते वाहतुक सुधारणा कार्यक्रमाचा भुमी पुजन कार्यक्रम दिनांक २६/०७/२०२६ रोजी दुपारी १४:०० वा. तीनहात नाका येथे ज्ञानसाधना कॉलेजकडुन येणाऱ्या सर्व्हिस रोडचे बाजुला आयोजित करण्यात आलेला आहे. त्यामुळे तीनहात नाका जंक्शन ते ज्ञानसाधना कॉलेजकडे जाणारा व ज्ञानसाधना कॉलेजकडून तीनहात नाका जंक्शनकडे येणारा सर्व्हिस रोडवर वाहतुक कोंडी होणेची शक्यता आहे. त्यामुळे सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी, **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१)(अ)(ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :—

प्रवेश बंद – **१)** तीनहात नाका जंक्शन कडून ज्ञानसाधना कॉलेजकडे सर्व्हिस रोडने जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **तीनहात नाका जंक्शन येथील सर्व्हिस रोडवर 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग – सदरची वाहने तीनहात नाका जंक्शन कडून टिपटॉप हॉटेल बाजूचा कट मेंटल हॉस्पीटल सर्कल मार्गे पुढे इच्छित स्थळी जातील.

प्रवेश बंद – **२)** ज्ञानसाधना कॉलेजकडून तीनहात नाका जंक्शनकडे सर्व्हिस रोडने येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **ज्ञानसाधना कॉलेजकडून येणाऱ्या सर्व्हिस रोडवर 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग – सदरची वाहने इंटरनिटी मॉल कटने हायवे मार्गे तीनहात नाका जंक्शन मार्गे पुढे इच्छित स्थळी जातील.

सदर वाहतूक अधिसुचना **दिनांक २६/०७/२०२६ रोजी सकाळी १०:०० वा. ते सायंकाळी २०:०० वा. पावेतो** अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

(पंकज शिरसाट)
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.

२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सादर,

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ – १ व ५/वि.शा. ठाणे

प्रत कार्यवाहीसाठी :—

प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, ठाणे.
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे
प्रत :— पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर

२/– सदरची अधिसुचना नागरिकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे

२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :– संबंधित सपोआ, वाहतूक विभाग, ठाणे शहर व संबंधित प्रभारी अधिकारी, वाहतूक उपविभाग, ठाणे शहर.

२/– म.न.पा.ठाणे च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सुचना फलक लावून घ्यावी.